**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम २९९ प्रमाणे आरोपीच्या गैरहजेरीत साक्षीदाराचा पुरावा</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की:
माझे नावः निलेश मोहन गांधी
वयः ५७ वर्षे, व्यवसायः किराणा दुकान,
राहणार – आंबेवाडी नाका, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. एस. कुलकर्णी यांच्यामार्फत :</u>**

०१. मी ५० वर्षांपुर्वीपासुन माझ्या नमुद पत्त्यावर वास्तव्यास आहे. माझे किराणा दुकान देखील तेव्हापासुन आहे. माझ्याकडे असलेली महिंद्रा पिकअप क्र. एम.एम.०६/९३९० ही गाडी माझ्या आईच्या नावे होती. दि.१३.०९.२००९ रोजी आम्ही रात्री जेवण करुन आमच्या घरात झोपलो होतो. आमचे घर व दुकान एकमेकांना लागुन आहे. आमची महिंद्रा पिकअप गाडी त्यावेळी दुकानासमोर लावली होती. सकाळी उठल्यानंतर आम्हाला आमची गाडी दुकानासमोर दिसली नाही. त्यामुळे मी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

०२. आता मला दाखवलेली **फिर्याद** तीच असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५८** देण्यात येत आहे. महिना झाल्यानंतर आमची गाडी परभणी येथील वाटुण गावाजवळ अपघातात रस्त्यावर पडुन उभी असल्याचे पोलीसांकडुन समजले. मी गेलो व गाडी घेवुन आलो. परभणी येथील पठाण नावाच्या चालकाने ती गाडी नेली होती. माझी गाडी मला परत मिळाली. पठाणला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी तो न्यायकक्षात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.07.13 17:51:05 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)
दि. १३.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.